डॉ. उत्तम कदम, डॉ. सखाराम आघाव व डॉ. देवानंद बनकर



अंडी अळी कोष पतंग

हरभऱ्यावरील घाटे अळीच्या विविध अवस्था.

हरभरा पिकावर घाटे अळीचा प्रादुर्भाव

रब्बी हंगामातील हरभरा हे पीक फुलोऱ्यापासून काढणीच्या अवस्थेत आहे. या पिकावर या अवस्थेत घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसतो. ही बहुभक्षी कीड असून, कापूस, ज्वारी, मका, टोमॅटो, तूर व अन्य कडधान्य पिकांवरही आढळते. सध्याचे वाढते तापमान व मध्येच येणारे ढगाळ वातावरण किडीसाठी पोषक ठरते. या किडीमुळे हरभरा पिकाचे ३० ते ४० टक्क्यांपर्यंत नुकसान होऊ शकते.

कीड व्यवस्थापन

- वेळोवेळी निंदणी किंवा कोळपणी करून पीक तण विरहित ठेवावे. बांधावरील कोळशी, रानभेंडी व पेटारी यासारखी तणे काढून नष्ट करावीत.
- इंग्रजी 'टी' आकाराचे पक्षिथांबे ५० प्रति हेक्टरी दर १५-२० मीटर अंतरावर लावावेत. त्यांची उंची पिकापेक्षा १ ते १.५ फूट अधिक असावी. त्यावर पक्षी बसून घाटे अळ्या वेचून खातात.
- घाटे अळीच्या सर्व्हेक्षणासाठी हेक्टरी ५ कामगंध सापळे (हेलोल्यूर) जमिनीपासून १ मीटर उंचीवर लावावेत.
- पीक ५० टक्के फुलोऱ्यावर असताना व घाटे भरताना सुरुवातीच्या काळात अळीचा प्रादुर्भाव वाढल्यास शक्य तितक्या अळ्या हाताने वेचून नष्ट कराव्यात.

प्रतिबंधात्मक फवारणी

शाकीय वाढीच्या अवस्थेतील पिकामध्ये निंबोळी अर्क (५ टक्के) किंवा अॅझाडिरॅक्टिन (१५०० पीपीएम) ५० मि.लि. प्रति १० लिटर पाणी या प्रमाणे प्रतिबंधात्मक फवारणी घ्यावी. १५ दिवसांच्या अंतराने दुसरी फवारणी घेतल्यास घाटे अळीचा पतंग अशा पिकावर अंडी घालणे टाळतो.

जैविक नियंत्रण

- प्रथम व द्वितीय अवस्थेतील अळ्या दिसत असल्यास, एचएएपीव्ही विषाणूवर (२५० एलई) आधारित कीटकनाशकाची १० मि.लि. प्रति १० लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी. विषाणूचे उन्हापासून संरक्षण व कार्यक्षमता वाढीसाठी १ ग्रॅम नील द्रावणामध्ये मिसळावी.
- बॅसिलस थुरिनजिएन्सीस प्रजाती कुर्सटाकी ४० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी.
- हवेतील आर्द्रता ७० टक्क्यांपेक्षा जास्त असल्यास बिव्हेरिया बॅसियाना (१.१५ टक्के विद्राव्य पावडर) ५० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी ही फवारणी फायदेशीर ठरते.

घाटे अळीची आर्थिक नुकसान पातळी

दोन अळ्या प्रति मीटर ओळींत आढळून आल्यास किंवा ५ टक्के घाट्यावर अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास अथवा सतत २-३ दिवस प्रत्येक कामगंध सापळ्यात ८ ते १० पतंग आढळून येत असल्यास.

रासायनिक नियंत्रण

घाटे अळीने आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्यास पुढील तक्त्यातील एका कीडनाशकाची फवारणी करावी. गरजेनुसार पुढील फवारणी कीटकनाशक बदलून १५ दिवसाने करावी.

घ्यावयाची काळजी

भाजीसाठी हरभऱ्याची कोवळी पाने काढून ती ताज्या स्वरूपात किंवा वाळवून वर्षभर वापरली जातात. अशी पाने तोडण्यापूर्वी पिकावर कीडनाशकाची फवारणी केलेली नसावी. कीडनाशक फवारणी केलेल्या पिकामध्ये त्या कीडनाशकाचा प्रतीक्षा कालावधी पूर्ण झाल्यानंतरच पाने खुडावीत. अन्यथा, भाजीमध्ये कीटकनाशकांचे अंश राहून आरोग्यास हानी पोहोचवू शकतात.

हरभरा पिकातील घाटे अळीच्या व्यवस्थापनासाठी केंद्रीय कीटकनाशक मंडळ व नोंदणी समितीने शिफारस केलेली कीटकनाशके

कीटकनाशकाचे नाव	प्रमाण (प्रति १० लिटर पाणी)	प्रतीक्षा कालावधी (दिवस)
क्लोरअँन्ट्रानिलीप्रोल (४७.८५ टक्के एससी)	०.८३ मि.लि.	२६
क्लोरफेनपायर (२४० ग्रॅम/लि. एससी)	१६-२० मि.लि.	४९
इमामेक्टीन बेन्झोएट (५ टक्के एसजी)	४.४ ग्रॅम	१४
इमामेक्टीन बेन्झोएट (१.९० टक्के ईसी)	७.५ मि.लि.	१४
इंडोक्झाकार्ब (१४.५० टक्के एससी)	८-१० मि.लि.	१९
इंडोक्झाकार्ब (१५.८० टक्के ईसी)	६.६६ मि.लि.	१८
लॅम्बडा सायहॅलोथ्रीन (५ टक्के ईसी)	१०-१२ मि.लि.	०६
स्पिनेटोरम (११.७० टक्के एससी)	७.५ -९ मि.लि.	२०
क्लोरअँन्ट्रानीलीप्रोल (५.२ टक्के) अधिक नोव्हॅल्युरॉन (८.५ टक्के एससी) (संयुक्त कीटकनाशक)	८ मि.लि.	०७
फ्लुबेन्डायअमाइड (८.३३ टक्के) अधिक डेल्टामेथ्रीन (५.५६ टक्के एससी) (संयुक्त कीटकनाशक)	५ मि.लि.	०७
नोव्हॅल्युरॉन (५.२५ टक्के) अधिक इमामेक्टीन बेन्झोएट (०.९ टक्के एससी) (संयुक्त कीटकनाशक)	१७.५ मि.लि.	११
नोव्हॅल्युरॉन (५.२५ टक्के) अधिक इंडोक्झाकार्ब (४.५० टक्के एससी) (संयुक्त कीटकनाशक)	१६.५-१७.५ मि.लि.	०९

- डॉ. देवानंद बनकर ७७५७९८७४५९